जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक - ४४४ दिनांक - १९/०६/२०२३

## हडपसर पोलीस ठाणे पुणे शहर

### खुनाचे गुन्हातील आरोपी टोळक्यास ४८ तासात अटक

दि.१६/०६/२०२३ रोजी फिर्यादी व मयत वैभव विठ्ठल गायकवाड हे गाडीवरून मिठाचे गोडावुन पाठीमागील फुरसुंगी रोडने जात असताना,त्यांचे पाठीमागुन आलेल्या दोन मोटार सायकलवरील पाच इसमांनी वैभव गायकवाड याचे मानेवर, गळयावर,तोंडावर,डोक्यावर,छातीवर,हातावर धारदार हत्याराने सपासप वार करुन तसेच लाकडी दांडक्याने मारुन वैभव गायकवाड याला जीवे ठार मारले. सदरबाबत **हडपसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.८८१/२०२३,भा.दं.वि.कलम ३०२,१४३, १४४,१४७,१४९,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५,भारतीय हत्यार कायदा कलम** ४(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्यातील आरोपी प्रतिक कामठे, शुभम गायकवाड, सोन्या पोटे, अनिकेत कटके व स्वराज दोरगे यांचे बाबत तपास पथकातील अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,विजयकुमार शिंदे, पोलीस उप निरीक्षक,अविनाश शिंदे व अंमलदार यांनी माहीती घेतली असता,सदर इसम हे गुन्हा झाल्यानंतर फरार झाले होते. तांत्रीक विश्लेषनव्दारे त्यांचे लोकेशन हे पाहीले असता ते स्वामी चिंचोली,रावणगाव खडकी या भागातील पहाटेच्यावेळी असल्याचे दिसले. लागलीच **तपास पथक अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक,विजयकुमार शिंदे,पोलीस अंमलदार,समीर पांडुळे,शाहीद शेख, प्रशांत दुधाळ,निखील पवार,अतुल पंधरकर,अजित मदने** यांचे पथक आरोपींचा शोध घेण्यासाठी रवाना करण्यात आले. आरोपींबाबत पुढे काहीएक उपयुक्त माहीती मिळत नसल्याने तपास पथकाने पुणे सोलापूर हायवेवरील रोडने तीन दिवस टेंभुर्णी, कुर्डुवाडी, माढा, वैराग या भागातील मिळणा[illegible]या तांत्रिक विश्लेषणाव्दारे आरोपींचा माग काढला. आरोपी हे वैराग ते माळवंडी पासून पुढे गेले नसल्याचे दिसून आले.

त्यानंतर हडपसर तपास पथकाने वैराग, इर्ले, सुर्डी, माळवंडी या ग्रामिण भागात स्थानिक नागरिक, पोलीस पाटील यांचे मदतीने माहीती काढत, आरोपी यांनी माळवंडी भागत वास्तव्य करून परत ते पुण्याचे दिशेने रवाना झाले बाबत माहीती मिळवली. ते जाण्याच्या मार्गावरिल फुटेत तपासात आरोपी हे सोलापूर पुणे हायवे ने जात असल्याबाबत उपयुक्त माहीती गोळा करून आरोपींचा पाठलाग करत आरोपी **१)प्रतिक पोपट कामठे,वय २४ वर्ष,रा.बेंदवाडी फुरसुंगी पुणे २)शुभम सुधाकर गायकवाड,वय २१ वर्ष रा. सदर ३)आशितोष ऊर्फ सोन्या शरद पोटे,वय २१ वर्ष,रा.जैननगर फुरसुंगी पुणे. ४)स्वराज सुनील दोरगे,वय १९ वर्ष रा. बेंदवाडी फुरसुंगी पुणे ५)अनिकेत ज्ञानेश्वर कटके,वय १९ वर्ष,रा.बेंदवाडी फुरसुंगी पुणे** यांना बोरीबेल दौंड येथून ताब्यात घेतले. आरोपींना हडपसर पोलीस ठाणेस घेवून येवून,त्यांचेकडे तपास करता त्यांनी मयत वैभव गायकवाड याचेबरोबर ऊरूसा मध्ये झालेल्या भांडणाचा राग मनात धरून खुन केला असल्याचे सांगीतले. पुढील तपास हडपसर पोलीस स्टेशनकडील पोलीस उप निरीक्षक,प्रतापसिंह शेळके हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५ श्री.विक्रांत देशमुख यांचे मागदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे,श्रीमती.अश्विनी राख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,अरविंद गोकुळे पोनि.(गुन्हे),विश्वास डगळे यांचे सुचनाप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,विजयकुमार शिंदे, पोलीस उप निरीक्षक, अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार,संदीप राठोड, समीर पांडुळे, सचिन जाधव, शाहीद शेख, प्रशांत दुधाळ, निखील पवार, अतुल पंधरकर, अजित मदने, भगवान हंबर्डे, अनिरूध्द सोनवणे, सचिन गोरखे, मनोज सुरवसे, अमोल दणके, प्रशांत टोणपे, रशिद शेख, कुंडलीक केसकर, चंद्रकांत रेजीतवाड यांचे पथकाने करुन प्रशंसनीय कामगिरी केली आहे.